**पर्यावरण पूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने मूर्ती विसर्जनाबाबतच्या दि. १ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः याचिका- २०२४/प्र.क्र.३४/तां.क.३**
नवीन प्रशासन भवन,१५ वा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ सप्टेंबर, २०२६

<u>संदर्भ</u> :-१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा दि.२४.०७.२०२५ रोजीचा अंतरिम आदेश.
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१ ऑगस्ट, २०२५
३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. १४.०८.२०२६ व दि.२०.०८.२०२५ रोजीचे अंतरिम आदेश

मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ९६/२०२४ (रोहीत जोशी व इतर वि. महाराष्ट्र शासन व इतर) व इतर न्यायालयीन प्रकरणे यामध्ये दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत दि. ०१.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर मार्गदर्शक सूचना हया दि. ३१.०३.२०२६ पर्यंत लागू होत्या.

जनहित याचिका ९६/२०२४ व श्री.रोहीत जोशी यांच्या IA No.४२१७/२०२६ अर्जावर मा. उच्च न्यायालयात दि. १५.०७.२०२६ पासून सुनावणी सूरू होती. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयातील सुनावणी पूर्ण झाली असून मा. न्यायालयाने दि. १४.०८.२०२६ व दि. २०.०८.२०२६ रोजी अंतरिम आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणी निकाल जाहीर होईपर्यंत, दि. २४.०७.२०२५ रोजीचे आदेश अंमलात राहतील. सबब, मा. उच्च न्यायालयाच्या दि. २४.०७.२०२५ रोजीच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित करण्यात आलेला दि.०१ ऑगस्ट, २०२५ रोजीचा शासन निर्णय व त्यान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत लागू राहतील.

त्यानुषंगाने पर्यावरण पूरक सण साजरे करण्याकरिता प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचना सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत लागू असून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घ्यावी. (दि.१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित मार्गदर्शक सूचना सोबत जोडल्या आहेत.)

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०११३०११९५५०४ असा आहे. सदरचे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department, 2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.09.01 13:15:09 +05'30'

**(रमेश मनाळे)**

**सह सचिव, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग**

**महाराष्ट्र शासन**

**प्रत**

१. मा. राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा. उपमुख्यमंत्री (क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५. मा. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य (मुंबई व नागपूर)
७. मा. मंत्री, पर्यावरण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
८. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, बृहंमुंबई महानगरपालिका, मुंबई.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रादेशिक अधिकारी, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
१५. विभागीय आयुक्त (सर्व)
१६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
१७. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१८. जिल्हाधिकारी (सर्व)
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
२०. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती
२१. निवडनस्ती

पर्यावरण पूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय मुंबई**
**शासन निर्णय क्रमांक: याचिका-२०२४/प्र.क्र.३४/तां.क.३**
**दिनांक: १ ऑगस्ट, २०२५**

**संदर्भ :-** केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १२ मे, २०२०.

**प्रस्तावना :-**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संदर्भाधीन दि. १२ मे, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनविण्यात येणाऱ्या मूर्त्यांवर बंदी घालण्यात आली होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत.

मूर्ती तयार करण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीसचा (पी. ओ. पी.) वापर आणि मूर्तीच्या विसर्जनामुळे जलस्त्रोतांवर होणारे परिणाम याबाबत शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरिता राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान मिशन मार्फत कुलगुरु, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने मूर्ती तयार करण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीसच्या (पी. ओ. पी.) वापर आणि मूर्तीच्या विसर्जनामुळे जलस्त्रोतांवर होणारे परिणाम याबाबतचा अहवाल दिनांक ३ मे, २०२५ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर केला होता. त्यानुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून दिनांक ५ मे, २०२५ रोजी सदर अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अवलोकनार्थ व विचारार्थ पाठविण्यात आला होता.

मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका ९६/२०२४ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये राज्य शासनाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास दिले होते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमलेल्या तज्ञ समितीच्या शिफारशी विचारात घेऊन मा उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ९ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये केवळ प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मुर्ती बनविण्यावरील बंदी उठविली होती. तथापि, राज्य शासनास प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत धोरण तयार करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन प्लास्टर ऑफ पॅरीस मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास समक्रमांकाच्या दिनांक २१ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केल्या होत्या.

सदर न्यायालयीन प्रकरणी (जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे) यामध्ये दिनांक २४ जुलै, २०२५ रोजीच्या आदेशान्वये राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक सुधारणा करून सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांची प्रभावी अंमलबजावणी व व्यापक जनजागृती करणेबाबत सुचित केले आहे.

मा. उच्च न्यायालयाने जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे यामध्ये दिनांक ९ जून, २०२५ व दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत सुधारीत एकत्रित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

१. पर्यावरण पूरक सण साजरे करण्याकरिता प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या दिनांक २१ जुलै, २०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक सुधारणा करून सुधारीत एकत्रित मार्गदर्शक सूचना सदर शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट-अ व ब (अनुक्रमे मराठी व इंग्रजी) जोडलेल्या आहेत. सदरच्या मार्गदर्शक सूचना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १२ मे, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये महाराष्ट्र राज्याकरिता समाविष्ट राहतील.

२. सदर मार्गदर्शक सूचनांच्या प्रसार व प्रसिध्दीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या वतीने माहिती व जनसंपर्क विभाग तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत आवश्यक व्यापक जनजागृतीची कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णयासोबतच्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य सर्व संबंधितांनी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

४. सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोरपणे करावी म्हणून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाचे निदेश देण्यात येत आहेत.

५. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळांना लहान आकाराच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना करण्याबाबत प्रोत्साहन द्यावे. तसेच सार्वजनिक मंडळामार्फत मोठ्या आकाराच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना करण्यात आल्यास सदर मूर्तीच्या ऐवजी विसर्जनासाठी प्रतिकात्मक स्वरुपात लहान मूर्त्यांचा वापर करणेबाबत प्रोत्साहीत करावे. तसेच प्रतिष्ठापित मोठ्या मूर्तीचा वापर पुढील वर्षी करण्याकरीता देखील प्रोत्साहन द्यावे.

६. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचनांची सक्त अंमलबजावणी करावयाची असून त्यानुसार मूर्त्यांच्या विसर्जन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना

करून ६ फूटापर्यंत उंचीच्या मूर्त्यांचे विसर्जन करण्यासाठी आवश्यक व पुरेशी कृत्रिम तलावांची व्यवस्था उभी करण्याची खबरदारी घ्यावी.

७. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी ६ फूट उंची पेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्त्यांचे विसर्जन हे कृत्रिम तलावातच केले जाईल याबाबत आवश्यक ती खबरदारी घ्यावी. सदर मार्गदर्शक सूचनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने सदर मार्गदर्शक सूचना व त्याअनुषंगाने केलेल्या मूर्ती विसर्जन सोयीसुविधाबाबत आवश्यक ती जनजागृती करण्याची व प्रसिध्दी देण्याची दक्षता घ्यावी.

८. सदर शासन निर्णयासोबतच्या मार्गदर्शक सूचना या मार्च, २०२६ पर्यंत साजऱ्या करण्यात येणाऱ्या सर्व सण / उत्सवाकरिता लागू राहतील.

९. सदर शासन निर्णयातील सूचना या पयार्वरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील कलम ५ नुसार पर्यावरण संरक्षणासाठी व प्रदूषण रोखण्यासाठी करावयाच्या उपायोजनांच्या अनुषंगाने देण्यात आलेले निर्देश समजण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८०११५२०३८६६०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department,
2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2025.08.01 15:22:27 +05'30'

**(रमेश मनाळे)**
**सह सचिव, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१ मा. राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
२ मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३ मा. उपमुख्यमंत्री ( नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४ मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५ मा. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधान परिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य (मुंबई व नागपूर)
७ मा.मंत्री, पर्यावरण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
८ मा.मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
९ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१० अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११ आयुक्त, बृहंमुंबई महानगरपालिका, मुंबई.
१२ महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३ प्रादेशिक अधिकारी, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.
१४ सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
१५ विभागीय आयुक्त (सर्व)
१६ आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
१७ आयुक्त, सर्व महानगरपालिका
१८ जिल्हाधिकारी (सर्व)
१९ मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
२० मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती
२१ निवडनस्ती

**शासन निर्णय क्रमांक याचिका-२०२४ /प्र.क्र.३४/तां. क. ३, दिनांक १ ऑगस्ट, २०२५ सोबतचे परिशिष्ट- अ (मराठी)**

**प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी महाराष्ट्र राज्याकरिता मार्गदर्शक सूचना**

मा. उच्च न्यायालयाने जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे यामध्ये दिनांक ९ जून, २०२५ व दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार पर्यावरण पूरक सण साजरे करण्याकरिता प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या दिनांक २१ जुलै, २०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक सुधारणा करून सुधारीत एकत्रित मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत. सदरच्या मार्गदर्शक सूचना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १२ मे, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या सूचनांमध्ये अधिकच्या स्वरुपात महाराष्ट्र राज्याकरिता समाविष्ट राहतील. सदर मार्गदर्शक सूचना या मार्च, २०२६ पर्यंत साजऱ्या करण्यात येणाऱ्या सर्व सणा / उत्सवाकरिता लागू राहतील.

१. प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्तींचे उत्पादक व विक्रेते यांनी मूर्ती विक्री करताना मूर्तीच्या मागील बाजूस, स्पष्टपणे दिसेल अशा स्वरुपाचे ऑईल पेंटने लाल रंगाने गोल आकाराचे चिन्ह करावे. याबाबत आवश्यक त्या सूचना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी उत्पादक व विक्रेते यांना द्याव्यात व याची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

२. प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती बनविणारे मूर्तीकार व मूर्ती विक्रेत्यांना सदर मूर्तीची विक्री करताना याबाबतची नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील, याचा समावेश संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती बनविणारे मूर्तीकार व विक्रेते यांना परवाना प्रदान करताना त्यामध्ये करण्यात यावा.

३. मूर्ती विक्रेत्याने प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती समवेत मूर्ती विसर्जनाबाबतची माहिती देणारी माहितीपत्रिका ग्राहकास द्यावी. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सदरच्या माहितीपत्रिका संबंधित विक्रेत्यांना पुरविण्यात याव्यात.

४. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळांच्या नोंदणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून सार्वजनिक मंडळाची नोंदणी करताना सदर मंडळाकडून बसविण्यात येणाऱ्या मूर्तीबाबतची आवश्यक सर्व माहिती, पीओपी मूर्ती आहे की नाही यासह, संकलित करून त्यानुसार विसर्जनाचा आराखडा व व्यवस्था निर्माण करावी.

५. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळांना लहान आकाराच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना करण्याबाबत प्रोत्साहन द्यावे. तसेच सार्वजनिक मंडळामार्फत मोठ्या आकाराच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना करण्यात आल्यास सदर मूर्तीच्या ऐवजी विसर्जनासाठी प्रतिकात्मक स्वरुपात लहान मूर्त्यांचा वापर करणेबाबत प्रोत्साहीत करावे. तसेच प्रतिष्ठापित मोठ्या मूर्तीचा वापर पुढील वर्षी करण्याकरीता देखील प्रोत्साहन द्यावे.

६. प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्तींचे उत्पादक व विक्रेते यांनी प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) पासून बनविण्यात येणाऱ्या घरगुती उत्सवांच्या, तसेच **सहा फुटापेक्षा कमी** उंचीच्या इतर सर्व

मूर्ती केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित कराव्यात. याबाबत आवश्यक देखरेख व संनियंत्रण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावे.

७. सार्वजनिक मंडळाच्या **सहा फुटापेक्षा जास्त** उंचीच्या मुर्तींचे विसर्जन, जर त्यांना विसर्जनासाठी इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल तर, सदर मुर्ती नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जित करण्याची त्यांना परवानगी असेल, तथापि सदर मुर्ती (प्लास्टर ऑफ पॅरीस) पाण्यात लवकर विरघळत नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशीच सर्व विसर्जीत साहित्याचे संकलन आणि योग्य विल्हेवाटीची दक्षता घ्यावी. स्थानिक स्वराज्य संस्था स्वतः किंवा विशेष एजन्सींच्या मदतीने समुद्रतळ किंवा मूर्ती विसर्जित केलेल्या नैसर्गिक जलस्त्रोतांची साफसफाई करणे सुनिश्चित करावे. तसेच संकलित मूर्तींचे शास्त्रोक्त पद्धतीने पुनर्वापर किंवा पुनर्प्रक्रिया संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे करावे.

८. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मूर्ती विसर्जनासाठी योग्य आकाराचे कृत्रिम तलाव बांधावे व त्याची माहिती वर्तमानपत्रे, सोशल मीडियाद्वारे, संकेतस्थळ व इतर माध्यमांतून जनतेपर्यंत पोहोचवावी. तसेच शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम, पथनाट्ये इत्यादींचे आयोजन करावे.

९. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीमध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावाकडे जाणाऱ्या मार्गांवर आवश्यक तेथे दिशादर्शक फलक लावावेत.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांनी विसर्जनापूर्वी इतर निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करण्याची व्यवस्था कृत्रिम तलावाशेजारी निर्माण करून संकलित करण्यात आलेल्या निर्माल्यावर पर्यावरण पूरक प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर किंवा पुनर्निमितीसाठी वापर करण्यात यावा.

११. स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रांमध्ये तयार करण्यात येणाऱ्या कृत्रिम तलावांमधील पाणी मूर्तीच्या अपेक्षित पाणी क्षमतेच्या ८-१० पट असावे. कृत्रिम तलावांमध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती विसर्जित केल्यानंतर ७ दिवसामध्ये कृत्रिम तलावातील पाणी त्याच स्थळी चुन्याच्या किंवा तूरटीच्या सहाय्याने प्रक्रिया करून, प्रक्रिया केलेले पाणी नजीकच्या शुध्दीकरण केंद्राकडे पाठवून व त्यावर आवश्यक ती प्रक्रिया करून सदर पाण्याचा विसर्ग करण्यात यावा. सदर विसर्ग करताना सदरचा विसर्ग हा पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत असलेल्या ठिकाणी होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१२. स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रामध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावामध्ये जमा झालेल्या गाळाची साठवण पर्यावरण पूरक पध्दतीने १५ दिवसांपर्यंत करून त्याचा उपयोग पुनर्वापर व पुनर्निमितीसाठी करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

१३. स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध पर्यावरणवादी संस्था व स्वयंसेवी संस्था (एन.जी.ओ.) ज्या प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्ती संकलित करून त्यांचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया

शास्त्रीयदृष्ट्या करतील अशा संस्थांना आवाहन करून त्यांच्याशी याबाबत आवश्यक करारनामा करावा. सदर करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना व मा. उच्च न्यायालयानें वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा.

१४. स्थानिक स्वराज संस्थांनी विसर्जनानंतर कृत्रिम तलावामध्ये जमा होणारा गाळ व पाणी यावर प्रक्रिया करून त्याचा वापर / पुनर्वापर करण्याकरीता या क्षेत्रामध्ये कार्यरत वैज्ञानिक व तांत्रिक संस्था उदाहरणार्थ राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) पुणे , राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई इत्यादी संस्थांशी करारनामा करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार कृत्रिम तलावातील गाळ व पाण्याचा विसर्ग शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

१५. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यामध्ये संपूर्ण वर्षभर साजरे करण्यात येणारे सण उत्सव पर्यावरणपूरक साजरे करण्याबाबत जनजागृतीसाठी प्रचार मोहीम राबवावी आणि त्याबाबतचा मीडिया प्लॅन तयार करून त्याची अंमलबजावणी करावी.

१६. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) संयुक्तरित्या राज्यभरात कृत्रिम तलावांमध्ये विसर्जनासाठी पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यास प्रोत्साहन देणारी व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. तसेच, पॅरिस प्लास्टर (POP) मूर्तीविषयीच्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी जनजागृती विविध माध्यमांद्वारे - सोशल मीडिया, पारंपरिक माध्यमे आणि माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या सहकार्याने अंमलात आणली जाईल.

१७. सदर मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर मार्गदर्शक सूचनांची कार्यनियमावली (SOP) तयार करुन प्रसारित करावी.

१८. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करताना मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन होईल, याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.

***************

शासन निर्णय क्रमांक याचिका-२०२४ /प्र.क्र.३४/तां.क.३, दिनांक १ ऑगस्ट, २०२५ सोबतचे परिशिष्ट- ब (इंग्रजी)

## Guidelines for Immersion of Plaster of Paris (POP) Idols in Maharashtra

As per Hon'ble High Court directions in Public Interest Litigation No. 96/2024 and other court cases, dated 9th June, 2025 and 24th July, 2025, by amending guidelines dated 21st July, 2025 the revised consolidated guidelines regarding immersion of Plaster of Paris (P.O.P.) idols for celebrating eco-friendly festivals are as follows. The said guidelines shall be included in the guidelines in addition with the guidelines dated 12th May, 2020 of the Central Pollution Control Board for the State of Maharashtra. The said guidelines shall be applicable for all festivals/festivals celebrated till March, 2026.

1. Manufacturers and sellers of Plaster of Paris (POP) idols shall mark a clearly visible circular red symbol using oil paint on the backside of the idols. The Local Self-Government Bodies (LSGBs) shall issue necessary instructions and ensure strict compliance.

2. Idol makers and sellers shall be mandatorily required to maintain a sale register for Plaster of Paris (POP) idols. The Local Self-Government Bodies (LSGBs) shall include this requirement as a condition for granting licenses to idol makers and sellers.

3. Idol sellers must provide an informational pamphlet about idol immersion along with the sale of POP idols. These pamphlets shall be supplied to the sellers by the respective local bodies.

4. The concerned local bodies shall establish a separate cell for the registration of Utsav Samiti / Sarvajanik Mandals within their jurisdiction. While registering these committees, the local bodies shall collect all necessary information regarding the idols installed under their jurisdiction including whether it is made of POP or not and accordingly prepare a plan and make appropriate arrangements for immersion.

5. All local bodies shall encourage 'Utsav Samiti / Sarvajanik Mandals' within their jurisdiction to install small-sized idols. In cases where large idols are installed, the Utsav Samiti / Sarvajanik Mandals should be encouraged to also install a smaller replica specifically for immersion purposes, while the larger idol may be reused or reinstalled in the following year.

6. Plaster of Paris (POP) idols intended for household celebrations or those below **six** feet in height shall be immersed only in artificial ponds. The concerned Local Self-Government Bodies (LSGBs) shall be responsible for implementation of these regulations.

7. In case of Utsav Samiti / Sarvajanik Mandal idols exceeding **six** feet in height, where no alternative immersion facility is available, such idols may be permitted to be immersed in natural water bodies, however since Plaster of Paris (PoP) doesn't dissolve immediately Local Self-Government Bodies shall ensure that collection of immersed

material on the very next day of immersion. The local Self- Government body shall ensure collection either by themselves or by engaging specialised agencies to clean the sea bed or natural water bodies where idols are immersed. Also, collection and scientific recycling or reuse shall be undertaken by the concerned local body in accordance with prescribed guidelines.

8. The local bodies shall construct artificial ponds of appropriate sizes for idol immersion and disseminate relevant information to the general public through newspapers, social media, website and other communication channels. Also to conduct awareness programs including street plays, educational events at school, colleges and other public places.

9. The local bodies shall install directional signages on roads leading to the artificial ponds designated for the immersion of Plaster of Paris (POP) idols within their jurisdiction, wherever necessary.

10. The local bodies shall set up separate arrangements adjacent to artificial ponds for the collection of other solid materials ('Nirmalya') and ensure eco-friendly processing of the collected material for reuse or recycling.

11. The water in artificial ponds designated for POP idol immersion shall be at least 8 to 10 times the expected volume required for immersion. Within 7 days after immersion, the water shall be treated with lime or alum at the same location. The treated water shall then be sent to a nearby treatment facility, STP/ ETP. Care shall be taken to ensure that the treated water is not discharged into drinking water sources.

12. The local government bodies shall take necessary measures to store the sediment accumulated in the artificial ponds created for the immersion of Plaster of Paris (POP) idols for a period of 15 days in an environmentally friendly manner and ensure its use for recycling or reprocessing.

13. Local bodies shall appeal to various environmental organizations and NGOs to collect, reuse, and recycle Plaster of Paris (POP) idols in a scientific manner, and may enter into necessary agreements with them. The terms and conditions of such agreements shall clearly incorporate these guidelines and the directions issued by the Hon'ble High Court from time to time.

14. Local bodies shall enter into agreements with scientific and technical institutions working in this field, such as the National Chemical Laboratory (NCL), Pune, and the Rajiv Gandhi Science and Technology Commission, Mumbai, for processing the sludge and water accumulated in artificial ponds after idol immersion. Based on their guidance, necessary measures shall be taken to dispose the sludge and water in a scientific and environmentally sound manner.

15. The Maharashtra Pollution Control Board (MPCB) shall launch state-wide awareness campaign to promote eco-friendly festival celebrations and shall prepare and implement a comprehensive media plan for the same.

16. All local bodies, along with the Maharashtra Pollution Control Board (MPCB), shall undertake extensive awareness campaigns across the state to promote the preparation of eco-friendly idols for immersion in artificial ponds. Also to implement wide reaching public awareness campaign on POP idol guidelines using various platforms, using social media, traditional media with the support of Directorate of Information and Public Relations.

17. These guidelines shall be published on the website of the Maharashtra Pollution Control Board (MPCB). Additionally, the MPCB shall prepare and disseminate a Standard Operating Procedure (SOP) based on these guidelines.

18. All local bodies must ensure strict implementation & enforcement of these guidelines and comply with the orders issued by the Hon'ble High Court from time to time.

…………….